वर्ष-०८ | अंक-०२ | मुंबई, मंगळवार ३० नोव्हेंबर ते ०६ डिसेंबर २०२१ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 ओमिक्रॉन या विषाणूचा सामना करण्यासाठी महापालिका सज्ज

3 → लिफ्ट देण्याचा बहाणा, निर्जनस्थळी नेत महिलांची लूट, पुण्यातील भामटा अखेर जेरबंद

व्हिस्की खरेदीच्या नादात दादरमधील 74 वर्षीय अभिनेत्रीची फसवणूक, 3 लाखांचा ऑनलाईन गंडा ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## शाळांबाबत शिक्षण विभागाच्या सूचनांची प्रतीक्षा



मुंबई : राज्य सरकारने राज्यातील सर्व शाळा १ डिसेंबरपासून सुरू करण्याबाबत निर्णय घेतला असून आरोग्य संचालनालयाने शाळा सुरू करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. मात्र शाळा सुरू करण्याबाबत अद्याप शिक्षण विभागाकडून सूचना आलेल्या नाहीत, त्यामुळे गोंधळात भर पडली आहे. राज्यात १ डिसेंबरपासून सर्व वर्गाच्या शाळा सुरू करण्याचा निर्णय शालेय शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड यांनी जाहीर केला. त्याबाबत शिक्षण विभागाने अद्याप काही सूचना दिलेल्या नाहीत. परंतु आरोग्य संचालनालयाने काय काळजी घ्यावी? याबाबत सूचना दिल्या आहेत. शाळांमध्ये प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये

...पान २ वर...

## 'कुछ नही होता यार' हे अजिबात चालणार नाही, मुख्यमंत्र्यांनी बजावलं



### परत एकदा संसगार्चा वाढ झाली तर लॉकडाऊनसारखे पाऊल परवडणारे नाही.

मुंबई, कोरोनाचा नवीन घातक व्हेरिएंट आढळून आल्यामुळे राज्यातील आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे. 'कोविडच्या दोन्ही लाटांचा आपण चांगला मुकाबला केला आहे, मात्र आता या विषाणूच्या ओमायक्रॉन व्हेरिएंटचे आव्हान चिंता वाढवणारे असून याची घातकता लक्षात घेता कोणत्याही परिस्थितीत संसर्ग वाढू नये म्हून मुंबईसह सर्व जिल्ह्यांच्या प्रशासनाने अतिशय काळजी घ्यावी. परत एकदा संसर्गाचा वाढ झाली तर लॉकडाऊनसारखे पाऊल परवडणारे नाही, त्यामुळे परत लॉकडाऊन लागू द्यायचा नाही या निर्धाराने नियमित मास्क वापरणे, अनावश्यक गर्दी न करणे, सुरक्षित अंतर पाळणे अशी काही बंधने पाळावीत लागतील' असं आवाहन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केलं. तसंच, कुछ नही होता यार' हे असं अजिबात चालणार नाही, असंही त्यांनी ठणकावून सांगितलं. मुख्यमंत्री उद्धव

...पान २ वर...

## अन्यथा २६ जानेवारी फार दूर नाही ; ४ लाख ट्रॅक्टर आणि शेतकरी पण इथेच आहेत



भारतीय किसान यूनियनचे नेते राकेश टिकैत यांनी पुन्हा एकदा मोदी सरकारवर निशाणा साधला आहे. यावेळी त्यांनी सरकारला पुन्हा एकदा २६ जानेवारी रोजी ट्रॅक्टर रॅलीचा इशारा दिल्याचं दिसून आलं आहे. केंद्र सरकारने कृषी कायदे परत घेतले जात असल्याची घोषणा केल्यानंतर, आता 'एमएसपी'वर हमी कायद्याची आंदोलक शेतकऱ्यांकडून मागणी केली जात आहे. या पार्श्वभूमीवर मुंबईत माध्यमांशी बोलताना राकेश टिकैत यांनी मोदी सरकारला इशारा दिला आहे. "आम्ही एकत्र आहोत, आम्ही आमचं मुद्दा मांडला, आम्हाला दहशतवादी घोषित करून

...पान २ वर...

## मुख्यमंत्री ठाकरेंनी बोलावली मंत्रिमंडळाची बैठक

दक्षिण आफ्रिकेत आढळलेला करोनाचा नवा ओमिक्रॉन विषाणू जगभरात पाय पसरत आहे. त्यातच त्याचा संसर्गाचा वेग आणि बदललेली जीवघेणी रचना यामुळे जगभरातून काळजी व्यक्त केली जात आहे. त्यामुळेच अनेक देशांनी खबरदारी घेण्यास सुरुवात केलीय. या सर्व पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी देखील महाराष्ट्रासाठी नियोजन करण्याबाबत पावलं उचलण्यास सुरुवात केलीय. याचाच भाग म्हणून सोमवारी (२९ नोव्हेंबर) मंत्रिमंडळाची



बैठक होणार आहे. यात ओमिक्रॉन विषाणूवरही चर्चेची शक्यता आहे. 'ओमिक्रॉन' डेल्टापेक्षाही जास्त वेगाने फैलावणारा असल्याने अनेक देशांनी सुरक्षेच्या दृष्टीने पावलं उचलण्यास सुरुवात केली आहे. पंतप्रधान मोदी यांनीही शनिवारी वरिष्ठ अधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेत सतर्कतेचे आदेश दिले. महत्वाचं म्हणजे करोनाचा सर्वाधिक फटका बसलेल्या महाराष्ट्राने पूर्वकाळजी घेत निर्बंध लावले आहेत. मुंबई पालिकेनेही

...पान २ वर...

## रस्त्यावरील पादचाऱ्यांना लुबाडणाऱ्या चोरांस वालीव पोलिसांनी केली अटक



वालीव : रस्त्यावरील पादचा-यांना दुखापत करुन त्यांच्याकडी वस्तु चोरी करण्याचे वाढते प्रमाण बघून वालीव पोलीस ठाण्याचे मा. वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी सदरील घटनांना आळा घालण्याच्या दृष्टीने सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने सहाय्यक पोलीस आयुक्त व प्रभारी अधिकारी, वालीव पोलीस स्टेशन यांनी वालीव गुन्हे प्रकटिकरण शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांना घटनास्थळावरील बारकावे व तांत्रिक विश्लेषण दृष्टीकोनातून तपास करण्याबाबत सुचना व मार्गदर्शन केले होते.त्याचदरम्यान दिनांक २२/११/२०२१ रोजी पियुष मोरेश्वर दळवी हे रात्रीच्या वेळेस गोखिवरे गावातील भाटपाडा येथील गणपती मंदिराच्या लगत रात्रीचे जेवण आटपुन चालत असतांना चार अनोळखी ईसमांनी दळवी यांच्या हातातील आय फोन जबरदस्तीने खेचून नेत होता त्यावेळी त्यांनी प्रतिकार केला असता चोरांनी त्यांना लाकडी दांडक्याने मारहाण केली होती. सदर घटनेच्या अनुषंगाने वालीव पोलीस ठाणे येथे तक्रार नोंदविली त्यावरून अज्ञात चोरानं विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर प्रकरणी पोलिसांनी गुप्त बतामीदार तसेच तांत्रिक माहितीच्या आधारे संशईतांचा शोध घेऊन वालीव पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटिकरण शाखेच्या अधिकारी व अंमलदार यांनी आरोपी १) विरेंद्रकूमार लखन पासवान वय : २४ वर्षे रा. वसई पूर्व २) आर्या मिथिलेश राज वय २३ वर्षे रा. वसई पूर्व आणि ३) अविनाश मिकी गूप्ता रा. गोखिवरे वसई पूर्व यांना अटक केली आहे तसेच आरोपी कडून चोरीस गेलेला मोबाईल हस्तगत करण्यात आला आहे. सदरची कामगिरी श्री.

...पान २ वर...

## मिरा भाईंदर महानगरपालिका शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याने फेरीवाल्याविरोधात केला गुन्हा दाखल

भाईंदर : मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक २ कार्यक्षेत्रातील शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याने फेरीवाल्याविरोधात दिनांक २८/११/२०२१ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.याबाबत सविस्तर वृत्त असे कि, दिनांक २८/११/२०२१ रोजी सायंकाळी ६.०० वाजल्यापासून प्रभाग समिती क्रमांक २ बॉम्बे मार्केट येथील ना फेरीवाला क्षेत्रातील फेरीवाल्यांवर कारवाई सुरू असताना चप्पल विक्रेता अब्दुल रेहमान निजामुद्दीन हाशमी या फेरीवाल्याने



महानगरपालिकामार्फत सुरू असलेल्या कायदेशीर कारवाईचा विरोध करून कर्मचाऱ्यांना धक्काबुक्की व मारहाण केली. त्यामुळे सदर फेरीवाल्यावर धमकी देणे, शारीरिक बळाचा उपयोग करून मारहाण करणे तसेच शासकीय कामात

...पान २ वर...

## व्याजाची रक्कम का दिली नाही?, म्हणत तरुणाचा धारदार शस्त्राने केला खून



पुणे – कर्जाऊ दिलेलया रक्कम परत देण्यावरून झालेल्या वादातून दोघांनी धारदार शस्त्रांने तरुणावर वार केल्याची खळबळजनक घटना घडली आहे. यामध्ये तरुणाचा मृत्यू झाला आहे. कात्रज -सिंहगड रोडवरील नवले पुलाच्या सर्व्हिस रोडवरही घटना घडली आहे. या घटनेत शरद शिवाजी आवारेचे

...पान २ वर...

## चोरी तसेच अंमली पदार्थांची विक्रीकरणारे दोन आरोपी पोलिसांच्या तावडीत

नायगांव : वालीव पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकास गुप्त बातमीदारांकडून माहिती प्राप्त झाली होती कि दोन इसम चिंचोटी आशानगर इथे गांजा हा अंमली पदार्थ विकण्यास घेऊन येणार आहेत मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीस उप आयुक्त श्री. संजयकुमार पाटील



यांना माहिती देवून त्यांच्या सुचना व मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. राहुलकुमार पाटील तसेच वालीव पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटिकरण पथकाच्या अंमलदारांनी कारवाई करुन मौजे नायगाव पूर्वस्थित चिंचोटी येथील आशा नगर खदानी जवळील पानाच्या टपरी शेजारुन १) प्रदिप शिवदत्त सिंग वय

...पान २ वर...

## मुंबईत क्रूरतेचा कळस

### युवतीवर आधी बलात्कार, चाकूने 26 वार, मग हातोडीने डोके फोडले



मुंबई : मुंबईतील कुर्ला येथे एका 20 वर्षीय तरुणीवर बलात्कार करुन नंतर तिची हत्या केल्याची घटना काल घडली होती. याप्रकरणी पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली आहे. आरोपींचा जबाब नोंदवत असताना आरोपींनी पोलिसांसमोर

...पान २ वर...

## वसईत आदिवासी महिलांना चोर समजून मारहाण करणारे सहाय्यक पोलीस निरीक्षक निलंबित

पालघर : आदिवासी महिलांना चोर समजून मारहाण करणारे सहाय्यक पोलीस निरीक्षक विनोद वाघ यांना अखेर निलंबित करण्यात आले आहे. शुक्रवारी 19 नोव्हेंबर रोजी वसईच्या पापडी बाजारात बाजार करण्यासाठी आलेल्या 6 आदिवासी महिलांना चोर समजून चौकीत नेऊन त्यांना दांड्याने मारहाण केली होती.

लाल बावटा पक्षाचे वसई तालुका सचिव कॉ. शेरु वाघ यांनी हा मुद्दा लावून धरला होता. शेकडो आदिवासी महिला



पुरुषांनी वसई पोलीस ठाण्यावर मोर्चा काढला होता. या मोर्चाची दखल घेऊन, मिरा-भाईंदर, वसई-विरारचे अप्पर पोलीस आयुक्त एस जयकुमार यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक विनोद वाघ यांचे निलंबन केले आहे. मारहाण प्रकरणाची खातेनिहाय चौकशी होऊन, चौकशीत निष्पन्न होईल त्याप्रमाणे शिक्षेची तरतूद असल्याचे ही वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी सांगितले आहे.

भाजीपाला आणायला गेलेल्या 6 आदीवासी महिलांना चोर समजून मारहाण पोटाची खळगी भरण्यासाठी वसईत कामासाठी आलेल्या सहा आदीवासी महिला 19 नोव्हेंबरला भाजीपाला घेण्यासाठी वसईच्या आठवडा बाजारात गेल्या होत्या. या आदीवासी महिलांना चोर समजून पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतलं, त्यानंतर त्यांना पोलीस ठाण्यात नेत त्यांना बेदम मारहाण करण्यात आल्याची घटना घडली होती.

या सर्व महिला मूळच्या पालघर जिल्ह्यातील

...पान २ वर...

## नागपूर हवालाचे गुजरात कनेक्शन, 98 लाखांवर रक्कम जप्त, तपासात लागली ईडी, आयटी



नागपूर : लकडगंजमधील हवाला व्यापाराचे कनेक्शन गुजरातमध्ये असल्याचं स्पष्ट झालंय. आतापर्यंत 98.46 लाख रुपये रक्कम जप्त करण्यात आली. या तपासात आता ईडी, आयटी लागली आहे. त्यामुळं हवाला व्यापाऱ्यांत भीतीचं वातावरण आहे. पोलीस विभागाच्या गुन्हे शाखेनं ही कारवाई केली. 26 नोव्हेंबरला झोन तीनचे पोलीस उपायुक्त गजानन राजमाने यांनी हा सर्जिकल स्टॉईक केला. 11 जणांची चौकशी करून त्यांना ताब्यात घेण्यात आले. भूतडा चेंबरसह तीन-चार खासगी लॉकर्सवर

...पान २ वर...

पोलीस बातमी पत्र
पोलीस
बातमी पत्र
मुंबई
✪ मुंबई, मंगळवार ३० नोव्हेंबर ते ०६ डिसेंबर २०२१


# ओमिक्रॉन या विषाणूचा सामना करण्यासाठी महापालिका सज्ज

- ***नागरिकांनी घाबरुन न जाता आरोग्याची काळजी घ्यावी***
- ***महापौर नरेश म्हस्के व आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांचे आवाहन***

ठाणे, दक्षिण आफ्रिकेमध्ये ओमिक्रॉन या विषाणूचा फैलाव वेगाने होत असल्यामुळे त्या पार्श्वभूमीवर ठाणे शहरात ज्या पायाभूत सुविधांची आवश्यकता आहे त्या सर्व सुविधा अदययावत ठेवण्याच्या सूचना महापालिका आयुक्त डॉ विपिन शर्मा यांनी सर्व अधिका-यांना दिल्या. ओमिक्रॉन या विषाणूच्या फैलावाचा सामना करण्यासाठी ठाणे महापालिका सज्ज झाली असून नागरिकांनी या नव्या विषाणूबाबत घाबरुन न जाता आपल्या आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक ती सर्व खबरदारी घ्यावी असे आवाहन महापौर नरेश म्हस्के व आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांनी केले आहे.

कै.नरेंद्र बल्लाळ सभागृह येथे ओमिक्रॉन या नव्या विषाणूच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्यावतीने करण्यात येणाऱ्या उपाययोजना / सुविधांबाबतच्या आढावा बैठकीत बोलत होते. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त 2 संजय हेरवाडे, उपआयुक्त मनीष जोशी, अशोक बुरपल्ले, सर्व प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त व आरोग्य विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

नव्या विषाणूच्या फैलावाबाबत आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीकोनातून नागरिकांनी मास्क वापरणे, आवश्यकता नसल्यास गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळणे, सोशल डिस्टन्सींगचे पालन करणे, हात स्वच्छ धुणे आदीं गोष्टीचे पालन करणे गरजेचे असल्याचे या बैठकीत नमूद करण्यात आले. सद्यस्थितीत ठाणे महापालिकेच्या पार्किंगप्लाझा या कोविड रुग्णालयात आवश्यक औषधसाठा, व्हेटीलेंटर, ऑक्सीजन सुविधा व इतर वैदयकीय सुविधा तसेच रुग्णवाहिका सज्ज ठेवण्याच्या सूचना आरोग्य विभागास व सर्व अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी उपस्थित असलेले आयएमएचे अध्यक्ष व टास्क फोर्स समितीचे सदसय डॉ.संतोष कदम, डॉ. आनंद भावे, डॉ. योगेश शर्मा यांनी देखील यांनी या नवीन विषाणूच्या फैलावाबाबत महापालिका अधिकाऱ्यांना माहिती देत करावयाच्या उपाययोजना करण्याच्या सूचना आरोग्यविभागाला दिल्या.

ठाणे शहरात 12 नोवहेबर पासून आजपर्यंत परदेशातून सात व्यक्ती ठाणे शहरात आलेल्या आहेत, त्यांच्याशी दैनंदिन संपर्क साधून त्यांची आरटीपीसीआर चाचणी करणे व आवश्यकता भासल्यास त्यांना कोरंटाईन करण्याच्या सूचना महापालिका आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

नागरिकांनी देखील शहरात फिरत असताना मास्कचा वापर करणे गरजेचे आहे तसेच गरज नसल्यास गर्दीची ठिकाणी जाणे टाळावे व महापालिका देत असलेल्या सर्व सूचनांचे पालन करुन नागरिकांनी स्वत:ची काळजी घेण्याचे आवाहन महापौर नरेश म्हस्के व आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांनी केले आहे.

ठाणे महानगरपालिकेच्या कै.नरेंद्र बल्लाळ सभागृहात ओमिक्रोन या विषाणूच्या फैलावाबाबत करावयाच्या उपाययोजनाबाबत आढावा बैठक घेताना महापालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा. सदर बैठकीस अतिरिक्त आयुक्त 2 संजय हेरवाडे, उपआयुक्त मनीष जोशी, अशोक बुरपल्ले, सर्व प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त व आरोग्य विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# बारमालकांनो सावधान! बिल मागितले म्हणून बार पेटविण्याचा प्रयत्न, पेट्रोल टाकून लावली आग

नागपूर : येथील अंबाझरी पोलीस ठाण्याच्या हद्दील अजब घटना घडली. दारुड्यांनी यथेच्च दारू ढोकसली. त्यानंतर बारच्या कर्मचाऱ्यांना त्यांनी बिल दिले. बिल का मागितले म्हणून मद्यपींनी टेबल, खुर्च्यांची तोडफोड केली. त्यानंतर पेट्रोल टाकून बार पेटविण्याचा अयशस्वी प्रयत्न केला.



रविनगर चौकात उडीपी बार अँड रेस्टॉरंट आहे. असलम कलाम शेख (वय ३१) आणि रहिम शेख (वय ३२) हे दोघेही या बारमध्ये दारू पिण्यासाठी आले. शनिवारी दुपारची ही घटना. सुमारे अर्धा तास त्यांनी दारुवर यथेच्च ताव मारला. एक लाओ, दुसरा लाओ, असे म्हणून मस्त दारु ढोकसली. ती त्यांना चांगलीच लागली. तेवढ्यात वेटरनं त्यांना बिल मागितले. त्यामुळं चढलेल्या दोघांचीही चांगलीच आग झाली. त्यांनी बारमधील खुर्च्यांची फेकाफेक सुरू केली.

टेबलवर पेट्रोल टाकून लावली आग

असलमनं तर सीपीयू, मॉनिटर खाली आदळून फोडले. शिवाय बिअरच्या बॉक्सची तोडफोड करून नुकसान केले. असलमनं खिशातील बॉटल काढली. त्या बॉटलमध्ये दारू नसून पेट्रोल होते. ते टेबल-खुर्च्यांवर फेकले. त्यानंतर टेबल-खुर्च्या पेटविण्याचा प्रयत्न केला. बारच्या कर्मचाऱ्यांची धावाधाव झाली. त्यांनी बाजूनं पाणी आणले. लागलेली आग विझवली. यामुळं बारमध्ये चांगलाच गोंधळ उडाला. मग कर्मचारीही एकवटले. त्यांनी आरोपींची चांगलीच धुलाई केली. त्यानंतर त्यांची नशा उतरली. झिंग जरा कमी झाली.

दोन्ही आरोपींना अटक

घटनेची माहिती अंबाझरी पोलिसांना देण्यात आली. पीएसआय शिंदे यांनी घटनास्थळी धाव घेतली. आरोपींना ताब्यात घेतले. बार संचालक वसंतकुमार बेथरिया यांनी तक्रार नोंदवली. अंबाझरी पोलिसांनी असलम आणि रहिम शेखविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली. त्यानंतर कुठे बारमालकानं सुटकेचा निःश्वास सोडला. तरीही ज्याला झिंग येईल, अशांकडून आता बिलाचे पैसे मागायचे असतील, तर जरा सावध होण्याची वेळ आली आहे.

## 'कुछ नही होता यार' हे

ठाकरे यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे कोविड विषयक बैठक घेतली. या बैठकीत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी कोरोनाच्या नव्या धोक्याबद्दल चिंता व्यक्त केली. तसंच, राज्यातील संपूर्ण परिस्थितीचा आढावा घेतला. आपल्या सर्वांमधीलच बेसावधपणा वाढला आहे. "कुछ नही होता यार" असा पवित्रा मोठ्या संकटात टाकू शकतो. त्यामुळे मास्क न वापरणे आणि नियम तोडून अनावश्यक गर्दी करणे यावर काटेकोर कारवाई झालीच पाहिजे असे पहा, अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांनी बजावलं. नवा व्हेरिएंट हा उंबरठा ओलांडून आला आहे का हे काळजीपूर्वक पाहावे लागेल. दोन्ही लाटांमध्ये आपल्याला कुठं कमी पडलो ते कळत होते. ऑक्सिजनचा साठा वाढविण्यासाठी धावपळ करावी लागली होती. त्यामुळे आता या नव्या विषाणू प्रकारामुळे शहरे असो किंवा दुर्गम भागातली रुग्णालये असोत, आपल्याला ऑक्सिजन निर्मिती, ऑक्सिजन साठा, आगीच्या घटना घडू नयेत म्हून अग्निसुरक्षा तसेच स्थापत्य विषयक ऑडिट, औषधांची उपलब्धता हे सर्व प्रत्येक जिल्हा प्रशासनाने जातीने पाहावे, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. 'महाराष्ट्रातील जनता समजूतदार आहे. यापूर्वीही सरकारच्या सर्व सूचनांचे पालन त्यांनी केले आहे. कोविडचे रुग्ण कमी झाल्यामुळे लोकांमध्ये बेसावधपणा आला आहे. या विषाणूशी कसे लढायचे , कोणते उपचार करावेत हा नंतरचा भाग झाला पण मुळात हा संसर्ग वाढू द्यायचा नसेल तर मास्क अनिवार्य आहेच असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, आता लग्नसराईचे दिवस आहेत. मित्र- आप्तेष्ट परदेशातून देखील येतील त्यामुळे आपल्याला खूप काळजी घ्यावी लागणार आहे' असं मुख्यमंत्री म्हणाले. 'परदेशातून लोक मोठ्या प्रमाणावर मुंबईत व इतर ठिकाणी येणे सुरू झाले आहे . त्यापैकी अनेक जण देशांत इतरत्र उतरून देशांतर्गत विमान सेवेने , रस्ते व रेल्वेमार्गे येतात. त्यांच्यात कुणी विषाणूचा वाहक असेल तर इतरांना मोठा धोका होऊ शकतो त्यामुळे अशा प्रवाशांची तपासणी करणे, त्यांच्याकडे लक्ष ठेवणे अत्यावश्यक आहे , त्यादृष्टीने लगेच युद्ध पातळीवर कामाला लागा असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी मधल्या काळात कमी झालेल्या चाचण्यांवर चिंता व्यक्त केली व चाचण्या वाढविण्याचे निर्देश दिले. विषाणूच्या नव्या प्रकाराला ओळखणारे किटस राज्यातील प्रयोगशाळांना मिळण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. 'छोट्या छोट्या गोष्टींनी या विषाणूला प्रतिबंध होऊ शकतो हे लक्षात ठेवा असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, दोन्ही डोससह लसीकरण करून घेणे अतिशय आवश्यक असून प्रत्येकाने ही काळजी घेतलीच पाहिजे', असं आवाहनही त्यांनी केलं.

## चोरी तसेच अंमली पदार्थांची विक्रीकरणारे

३० वर्ष २) मैनुद्दिन आयुब शेख वय २५ वर्षे यांना १ किलो १०० ग्रॅम वजनाच्या १०हजार रुपये किंमतीच्या गांजासह रंगेहाथ ताब्यात घेतले. तसेच दोन्ही आरोपी कडुन वालीव पोलीस ठाणे गुन्हयातील चोरी केलेली यामाहा कंपनीची एफ झेड मॉडेलची सिल्वर कलरची मोटार सायकल ताब्यात घेण्यात वालीव पोलीसांना यश आलेले आहे. या प्रकरणी वालीव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उप निरीक्षक श्री. प्रशांत चव्हाण हे करीत आहेत.सदर गुन्हयात अटक करण्यात आलेला आरोपी प्रदिप सिंग हा सराईत अंमली पदार्थ विक्री करणारा असून वालीव पोलीस ठाण्यात त्याच्यावर एक गुन्हातील फरार आरोपी असून त्यास पकडण्यात पोलिसांना यश आले आहे.

वरील कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ-२ वसई, श्री. पंकज शिरसाठ, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळीज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, पोनि/ राहूलकूमार पाटील (गुन्हे), गुन्हे प्रकटिकरण शाखेचे पोहवा. मनोज मोरे, मुकेश पवार, पो.ना. सचिन दोरकर, राजेंद्र फड, पो.अंम. गजानन गरीबे, सुर्यकांत मुंढे, व जयवंत खंडवी अश्यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

## मुख्यमंत्री ठाकरेंनी बोलावली

आंतरराष्ट्रीय प्रवाशांची माहिती संकलित गोळा करण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी महत्वाची बैठक बोलावली आहे. उद्धव ठाकरे यांनी कोविडसंदर्भात राज्यातील सर्व विभागीय आयुक्त जिल्हाधिकाऱ्यांची बैठक बोलावली आहे. मुख्यमंत्री व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून संपूर्ण परिस्थितीचा आढावा घेणार आहेत. राज्यात कठोर नियमावली सर्वत्र मुखपट्टी परिधान करणे आवश्यकच, मुखपट्टीशिवाय कोठेही फिरता येणार नाही, रुमालाला परवानगी नाही, तोंडाला रुमाल गुंडाळल्यास ५०० रुपये दंड. उपनगरीय रेल्वे, बेस्ट बस, राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) बस, मेट्रो, मोनो रेलसह स्थानिक परिवहन सेवांच्या बसमध्ये लसीकरण झालेल्यांनाच मुखपट्टीसह प्रवेश.

खासगी बस, गाड्या, टॅक्सी, रिक्षा, ओला-उबरमध्ये लसीकरण झालेल्यांनाच प्रवेश. नियमांचे उल्लंघन केल्यास चालक व प्रवाशास ५०० तर वाहनमालकास १० हजार रुपये दंड.

## व्याजाची रक्कम का दिली

( वय- 43, धनकवडी ) याचा मृत्यू झाले आहे. या प्रकरणी मृताचा मित्र प्रशांत कदम (वय 37 धनकवडी ) याने पोलिमिट तक्रार दिली आहे. याप्रकारणी पोलिसांनी आरोपी प्रकाश शिंदे व त्याच्या साथीदाराच्या विरोधात हत्येचा गुन्हा दाखल केला आहे.

व्याजाचे पैसे देण्यावरून झाला वाद याबाबत मिळालेले माहिती अशी की मृत शरद आवारे याने प्रकाश शिंदे यांकडून व्याजाने पैसे घेतले होते. त्या पैश्यांवरील व्याजाची रक्कम तो नियमितपणे भरतच होता. चालू महिन्यात शरद आवारे याला व्याज भरणे शक्य झाले नव्हेत. मात्र चालू महिन्याचे व्याज दिले नाही म्हणून त्याला प्रकाश शिंदेने भेटायला बोलावले होते. प्रकाशला भेटण्यासाठी शरद आला. त्याच वेळी प्रकाश व त्याच्यासोबत त्याचा एका साथीदार चंद्रलेखा वेअरहाऊस जवळ भेटले. तेथे त्यांच्या महिन्याचे व्याज का नाही दिले यावरुन वाद झाला. वादाचे रूपांतर भांडणात झाले त्यानातूनच प्रकाश व त्याच्या साथीदाराने शरदवर धारदार शस्त्राने हल्ला केला. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या शरदला तिथेच टाकून दोघांनी पाला काढला. घटनेनंतर जखमी अवस्थेत शरदाला रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच त्याचा मृत्य झाला. सिंहगड पोलीस अधिक तपास केला आहे.

## नागपूर हवालाचे गुजरात

कारवाई करण्यात आली. व्यापाऱ्यांच्या उत्पन्नाचा स्त्रोत जाणून घेण्यासाठी तपास आयकर विभाग आणि ईडीकडं सोपविण्यात आलाय. सराफा बाजारातील बहुतांश व्यापारी सुरक्षेसाठी खासगी लॉकर्समध्ये दागिने, सोने ठेवतात. लग्नाचा सिझन असल्यानं व्यापाऱ्यांना वेळेवर डिलिव्हरी देण्याची चिंता सतावत आहे. नोटांच्या अनुक्रमांकावर चालतो खेळ हवालाद्वारे करोडोंची उधळपट्टी केली जाते. हा सगळा खेळ नोटांच्या अनुक्रमांकाच्या आधारे खेळला जातो. या व्यवसायात आयकरासह व्यापारी जीएसटीही वाचवतात. मुंबईपासून ते दिल्ली, चेन्नई, कलकत्ता, मद्रास, रायपूर, जबलपूर, नागपूर आणि देशातील सर्व मोठ्या शहरांमध्ये व्यापारी हवाला व्यापाऱ्यांच्या मदतीने पैसे पाठविले जातात. यासाठी शहराच्या अंतरानुसार 1 लाखावर जवळपास 400 ते 500 रुपये कमिशन लागते. जबलपूर पाठोपाठ नागपूर केंद्र गुजरातमधील सुरत, बडोदा आणि अहमदाबाद हे हवाला व्यापाऱ्यांचे मोठे केंद्र आहे. याआधी बहुतांश सराफा व्यावसायिकांचा यात सहभाग होता. मात्र हळूहळू औषध, वाहतूक, बिल्डर, बुकीही या व्यवसायात उतरले. त्यानंतर मोठ्या रकमेची उधळण करण्यासाठी नवनवीन युक्त्याही वापरल्या जातात. 2015 नंतर जबलपूरमध्येही अनेक व्यापाऱ्यांनी हवाला व्यवसायात उडी घेतली. जबलपूरनंतर आता नागपूर हे हवालाचे मोठे केंद्र बनले आहे. हवाला व्यापारी आपला व्यवसाय कायदेशीर करण्यासाठी त्यांच्या खात्यात सोने, चांदी आणि हिऱ्यांची खरेदी दाखवतात. मात्र, प्रत्यक्षात ही सर्व बिले बोगस राहतात. विदेशी व्यापाऱ्यांकडून हिरे-सोने खरेदी केल्याचा दावा केला जातो. या बिलांचा संदर्भ देऊन हे व्यावसायिक सुरत-मुंबईच्या बँकांमधून कोट्यवधी रुपये परदेशी बँकांमध्ये हस्तांतरित करतात. प्रत्यक्षात एकही हिरा किंवा सोन्याचा तुकडा भारतात येत नाही.

## पृष्ठ १ वरुन

### शाळांबाबत शिक्षण विभागाच्या सूचनांची प्रतीक्षा

किमान सहा फूटांचे अंतर ठेवणे, मास्क वापरणे, हात धुवणे, त्यासाठी प्रशिक्षण देणे आदी सूचना दिल्या आहेत. प्रतिबंधित क्षेत्रातील विद्यार्थ्यांना शाळेत बोलावू नये, शाळांची संपूर्ण स्वच्छता करून घ्यावी. शाळांमध्ये बायोमेट्रिक हजेरी घेतली जाऊ नये. शाळांमध्ये गर्दी होणार नाही असे कोणतेही खेळ, कार्यक्रम, उपक्रम आयोजित करू नये, आदी सूचना देण्यात आल्या आहेत. शाळा सुरू झाल्यावर ज्यांना कोणतीही लक्षणे नाहीत, अशाच शिक्षक, शिक्षकेतर आदींना शाळांमध्ये प्रवेश दिला जावा. समुपदेशनाची व्यवस्थाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहे. जे विद्यार्थी विलगीकरणात जातील, त्या विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षणाची सोय उपलब्ध करून द्यावी, शाळेतील कोणालाही करोनाची लक्षणे दिसू लागल्यास ती व्यक्ती अथवा विद्यार्थ्यांला भेदभावाची वागणूक दिली जावू नये, अशाही सूचना आरोग्य सेवा संचालक डॉ. अर्चना पाटील यांनी दिल्या आहेत.

### अन्यथा २६ जानेवारी फार दूर

तुरूंगात टाका. भारत सरकारने आपलं डोकं ठीक करून घ्यावं. ते जे गुंडागिरी करू इच्छित आहेत, ती त्यांची गुंडागिरी चालणार नाही. वर्षभर शेतकऱ्यांनी खूप सहन केलं. आपलं डोकं ठीक करून एमएसपीवर हमी कायदा तयार करावा. नाहीतर आम्ही आहे तिथेच आहोत, २६ जानेवारी काही दूर नाही मग. ही २६ जानेवारी पण इथेच आहे आणि देशाचे चार लाख ट्रॅक्टरपण इथेच आहेत आणि या देशाचा शेतकरी देखील इथेच आहे. आपलं डोकं ठीक करून चर्चा करावी.” असं शेतकरी नेते राकेश टिकैत मोदी सरकाराल उद्देशून म्हणाले आहेत.

हिवाळी अधिवेशन नागपूरला न होण्याचं काही विशेष कारणं? अनिल परब म्हणाले…

मागील वर्षी २६ जानेवारी रोजी, प्रजासत्ताक दिनी राजधानी दिल्लीत आंदोलक शेतकऱ्यांनी काढलेल्या ट्रॅक्टर रॅली दरम्यान मोठ्याप्रमाणात हिंसाचार उफाळला होता. मोठ्या संख्येने आंदोलक शेतकरी लाल किल्ल्यावर चढले होते. त्या घटनेमुळे संपूर्ण देशभरातील राजकीय वातावरण तापलं होतं. आता पुन्हा एकदा राकेश टिकैत यांनी अप्रत्यक्षपणे प्रजासत्ताक दिनी ट्रॅक्टर रॅलीचा सूचक इशारा दिल्याचे दिसत आहे.

दरम्यान, किसान मजदूर महापंचायतीत शेतकरी नेते राकेश टिकैत यांनी मोदी सरकारवर जोरदार हल्ला चढवला. “सरकार धोखा करत आहे. सतर्क राहण्याची गरज आहे. सध्या सरकार चर्चा करण्याच्या लाइनवर आलेलं नाही. हे सरकार षडयंत्रकारी, बेईमान आणि फसवे आहे. शेतकरी समाज आणि कामगारांना कमी दाखवण्याचा प्रयत्न करत आहे.” अशी टीका यावेळी राकेश टिकैत यांनी केली. टिकैत यांनी मोदी सरकारला हा अल्टिमेटम अशावेळी दिला आहे, जेव्हा सोमवारपासून संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरू होत आहे आणि पहिल्याच दिवशी तिन्ही कृषी कायदे परत घेण्यासाठी विधेयक सादर केले जाईल. काही दिवसांपूर्वीच पंतप्रधान मोदींनी केंद्र सरकारचे तिन्ही कृषी कायदे परत घेत असल्याची घोषणा केली होती. यावेळी त्यांनी एमएसपीवर विचार करण्यासाठी समिती गठीत करण्याचेही आश्वासन दिले होते.

### रस्त्यावरील पादचाऱ्यांना लुबाडणाऱ्या

संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ-2 वसई, श्री. पंकज शिरसाट, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. राहुलकुमार पाटील, गुन्हे प्रकटिकरण शाखेचे, पोहवा. मुकेश पवार, मनोज मोरे, पो.ना. सचिन दोरकर, राजेंद्र फड, पो. अंम. गजानन गरीबे. सुर्यकांत मुंढे, जयवंत खंडवी यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

### वसईत आदिवासी महिलांना चोर समजून

कासा परिसरात राहणाऱ्या आहेत. बेबी नारायण वावरे, दीपिका दिनेश वावरे, विमल माणक्या पुंजारा, सोनम सबू भोईर, सीता संताराम भोईर, तारु सुभाष डोकफोडे असे या अधिवाशी महिलांची नाव आहेत. 19 नोव्हेंबर रोजी नाक्यावर काम नाही भेटले म्हणून, या सर्वजणी वसईच्या पापडी येथील आठवडी बाजारात भाजीपाला आणण्यासाठी गेल्या होत्या. त्यांचा कपडे, राहणीमान पाहून त्या चोरी करण्यासाठी आल्या आहेत का या संशयावरुन तेथील पोलीस कर्मचारी यांनी या या महिलांना रिक्षात बसवून बाजूच्याच पोलीस चौकीत नेले. तिथे पोलिसांनी त्यांना दांड्याने बेदम मारहाण केली असल्याचा आरोप या आदिवासी महिलांनी केला होता. आदिवासी महिलांना मारहाण झाल्यामुळे श्रमजीवी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी मारहाण करणाऱ्या पोलिसांवर कारवाई करावी आणि आदीवास्यांसोबतही माणसाप्रमाणे वागावे अशी मागणी ही करण्यात आली. त्यानंतर आता मारहाण करणारे सहाय्यक पोलीस निरीक्षक विनोद वाघ यांच्यावर अखेर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

### मिरा भाईदर महानगरपालिका

अडथळा निर्माण केल्याने भारतीय दंड संहितेनुसार भाईदर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदरची कारवाई उपायुक्त(अतिक्रमण) मारुती गायकवाड, अतिक्रमण विभागाचे विभाग प्रमुख नरेंद्र चव्हाण , सहाय्यक आयुक्त प्रियांका भोसले, कनिष्ठ अभियंता वैभव कुलथे यांच्या मार्गदर्शनानुसार फेरीवाला पथक प्रमुख राकेश त्रिभुवन, महाराष्ट्र सुरक्षा बल जवान, अतिक्रमण विभागाचे कर्मचारी, ठेका मजुर यांच्या उपस्थितीत कारवाई करण्यात आली.

### मुंबईत क्रूरतेचा कळस

धक्कादायक घटनाक्रम कथन केला. आरोपींनी पीडित तरुणीवर आधी बलात्कार केला. एवढ्यावरच नराधम थांबले नाहीत. बलात्कार केल्यानंतर पीडितेच्या अंगावर चाकूने 26 वेळा वार केले. त्यानंतर हातोडीने तरुणीचे डोके फोडले. त्यामुळे तरुणीचा एक डोळाही बाहेर आला होता. लग्नासाठी दबाव टाकत होती म्हणून काटा काढला रिजवान शेख आणि फैजल शेख अशी आरोपींची नावे आहेत. या बलात्कार आणि हत्याकांडाचा मास्टर माईंड रिजवान शेख हा आहे. आरोपी रिजवान शेख आणि पीडित तरुणीचे संबंध होते. त्यामुळे तरुणी आरोपीवर लग्नासाठी दबाव टाकत होती. लग्नावरून त्यांच्यात काही दिवसांपासून भांडणे सुरू होती. आरोपीला तरुणीशी लग्न करायचे नव्हते. त्याला तिच्यापासून दूर जायचे होते. त्यामुळे त्याने तिचा काटा काढायचे ठरवले. यासाठी रिजवानने आपला शाळेतील मित्र फैजलची मदत घेतली. फैजलसोबत मिळून त्याने मुलीच्या हत्येचा कट रचला. तरुणीला विश्वासात घेऊन कुर्ला येथील निर्जन असलेल्या एचडीआयएल कॉम्प्लेक्स येथे आणण्यात आले. तेथे प्लानुसार तिचा काटा काढला.

आरोपींना पकडणे पोलिसांसाठी आव्हानात्मक होते

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी पीडितेला तिच्या घरातून गुन्ह्याच्या ठिकाणी घेऊन गेला होता. जिथे त्याचा मित्र आधीच वाट पाहत होता. रिकाम्या इमारतीत पोहोचल्यानंतर आरोपीने तरुणीवर सलग 26 वेळा चाकूने हल्ला केला. यावेळी मुलीच्या मानेला आणि पोटाला लक्ष्य करण्यात आले. पोलिसांना मृतदेह छिन्नविछिन्न अवस्थेत सापडला होता. त्यामुळे आपल्यासाठी हे मोठे आव्हान होते. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला, ज्यात हत्येपूर्वी बलात्कार झाल्याची पुष्टी करण्यात आली, असे डीसीपी प्रणय अशोक यांनी सांगितले. 27 नोव्हेंबर रोजी मुंबईतील कुर्ला येथील व्हीबी नगर पोलिसांना एचडीआयएल कॉलनीतील एका रिकाम्या इमारतीच्या टेरेसवर मुलीचा मृतदेह सापडला होता.

पोलीस बातमी पत्र
महामुंबई
मुंबई, मंगळवार ३० नोव्हेंबर ते ०६ डिसेंबर २०२१


## संपादकीय...



### रबरबँड ताणू नका, तुटेल! ...त्यामुळे एसटी कर्मचाऱ्यांनो, आता बसचे स्टिअरिंग हाती घ्या

आझाद मैदानात माध्यमांच्या कॅमेऱ्यासमोर घशाच्या शिरा ताणून 'विलीनीकरण झालेच पाहिजे', असे ठासून सांगणारे एसटीचे कर्मचारी पाहताना ताणून तुटेपर्यंत रबरबँड ओढणाऱ्या मुलांची आठवण झाली. रबरबँड तुटतो तेव्हा तो ओढणाऱ्याला अखेरचा फटका देतो. त्यानंतर तो रबरबँड कुणाच्याच उपयोगाचा रहात नाही. मुलेही तो तेथेच फेकून खेळ संपवतात. रबरबँड योग्य प्रमाणात खेचला तर अपेक्षित परिणाम साधला जातो. मात्र गरजेपेक्षा जास्त ताणला तर तो तुटतो आणि ताणणाऱ्याच्या हातालाच रबरबँडचा फटका बसतो. म्हणजे रबरबँड ताणतांना किती ताणायचा याचे भान नसेल तर इजा ताणणाऱ्यालाच होते. कोरोनाकाळात एसटी कामगारांची दयनीय अवस्था झाली. त्यांना वेळेवर वेतन मिळाले नाही. राज्य सरकारच्या सेवेतील कर्मचारी घरी बसून वेतन घेत होते. एसटी महामंडळाचे कामगार, कर्मचारी यांच्यावर मात्र आर्थिक संकट ओढवले. त्यामुळे कामगारांच्या मनात खदखद होती. दिवाळीत लक्षावधी गोरगरीब गावी जातात तेव्हाच या कर्मचाऱ्यांनी संपाचे हत्यार उपसले. गैरसोय होऊनही कर्मचाऱ्यांच्या मागण्या रास्त असल्याने त्यांना प्रवाशांची सहानुभूती मिळाली. एसटी कामगारांच्या मूळ नेत्यांचे नेतृत्व खुजे असल्याने किंवा कर्मचाऱ्यांच्या अपेक्षा पराकोटीच्या वाढल्याने विरोधी भाजपचे नेते सदाभाऊ खोत व गोपीचंद पडळकर यांनी या आंदोलनात उडी ठोकली. सदाभाऊ हे आतापर्यंत शेतकऱ्यांचे नेते म्हणून महाराष्ट्राला माहीत होते, तर पडळकर हे त्यांच्या समाजाचे गाऱ्हाणे मांडतात, अशी माहिती होती. एसटी कामगारांचे नेतृत्व करण्याकरिता त्यांनी या विषयाचा किती अभ्यास केला होता ते त्यांचे त्यांनाच माहीत. मात्र खोत-पडळकर जोडगोळीने संपाचा रबरबँड ताणायला सुरुवात केली. फोटोत एसटी पाहून लहानाचे मोठे झालेले किरीट सोमय्या यांच्यासारखे नेतेही संपात स्वयंप्रसिद्धीचा गिअर टाकताना दिसले. भाजपचे यच्चयावत नेते या संपामुळे जनक्षोभ वाढून महाविकास आघाडीची कोंडी होणार या कल्पनेने रबरबँड ताणता येईल तेवढा ताणत होते. विलीनीकरणाची मागणी गुंतागुंतीची आहे, ती लागलीच मान्य होण्यात अनेक खाचखळगे आहेत. मात्र शरद पवार यांच्या मध्यस्थीनंतर परिवहनमंत्री अनिल परब यांनी पगारवाढीची व वेळच्यावेळी पगार देण्याची कामगारांची मागणी मान्य केली. एसटीच्या इतिहासात सर्वाधिक ४१ टक्के पगारवाढ दिल्याचे सरकार सांगत आहे. हा निर्णय जर सरकारला घ्यायचाच होता तर तो अगोदर घ्यायला हवा होता. हा निर्णय लागलीच घेतला तर खोत-पडळकर यांना म्हणजे पर्यायाने भाजपला त्याचे श्रेय मिळेल, अशी भीती सरकारला वाटली असावी. त्यामुळे कामगार किती चिकाटीने लढतायत व संप मोडून काढणे शक्य आहे का, असा विचार सरकारने केला. विलीनीकरणाची मागणी मान्य होणार नाही हे दिसल्यावर खोत-पडळकर यांना या संपातून पाय काढून घ्यायचा होता. मात्र चालत्या एसटीतून उतरण्याचा प्रयत्न केल्यास मुखभंग होण्याची शक्यता असते. वेतनवाढीची चर्चा सफल होताच उभयतांनी मैदानातून काढता पाय घेतला. मात्र रबरबँड ताणण्याचा खेळ रंगात आला असताना तो सोडून देण्यास कर्मचारी तयार झाले नाहीत. त्यातच काही 'बालिस्टर' उपटसुंभांनी आंदोलनाचा ताबा घेतला. एसटी कामगारांच्या विलीनीकरणाच्या मागणीवर निर्णय घेण्याकरिता न्यायालयाच्या आदेशावरून सरकारने समिती स्थापन केली आहे. त्याचा अहवाल येण्यास काही आठवडे लागणार आहेत. तोपर्यंत पदरात पडलेली पगारवाढ घेऊन पुढील लढाईकरिता बळ गोळा करायचे हीच कामगार लढ्यातील यशस्वी रणनीती असते. गिरणी कामगारांच्या संपातही नेत्यांनी रबरबँड तुटेपर्यंत ताणून गिरण्यांच्या मालकांच्या सुप्त इच्छांना अप्रत्यक्ष बळ दिले. सरकारने एसटी कामगारांना निलंबनाच्या नोटिसा दिल्या आहेत. राज्यातील शाळा सुरू होत असल्याने विद्यार्थी, शिक्षक यांना शाळेत जाण्याकरिता एसटी सेवेचा मोठा आधार लागेल. अशावेळी कर्मचारी रबरबँड ताणत बसले तर सरकारला त्यांच्यावर कारवाईचा बडगा उगारावा लागेल व कोरोनामुळे अगोदरच भावी पिढीचे शैक्षणिक नुकसान झाले आहे; त्यात भर पडेल. राज्यात महापालिका निवडणुका होणार आहेत आणि जागावाटपाच्या चर्चा करणाऱ्या युती, आघाडीच्या नेत्यांना आता रबरबँड ताणण्याचा खेळ खेळायचा आहे. त्यामुळे एसटी कामगार, कर्मचाऱ्यांनो, आता रबरबँडचा खेळ सोडा आणि बसचे स्टिअरिंग हाती घ्या, त्या घंटीचा आवाज अन् पाठोपाठ कानी पडणारा एसटीच्या खडखडाट कानी पडण्याकरिता महाराष्ट्र आसूसला आहे.

# अशक्त रोगी नासका

केंद्रीय आरोग्य खात्यातर्फे एकाच दिवशी जाहीर झालेले अहवाल एकत्र वाचल्यास निर्माण होणारे चित्र दखल घ्यायला हवी असे ठरते. यातील पहिला अहवाल आहे तो जननदराची तपशीलवार माहिती देणारा. यातून या भूमीत किती जीव जन्मास येतात, त्यांचे प्रमाण काय, लिंगभेद आदी तपशील समजून घेता येतो. दुसरा अहवाल हे जीव जन्मास आल्यानंतर त्यांचे आरोग्य कसे काय आहे, त्याची माहिती देतो. देशाच्या लोकसंख्याविषयक भविष्याची ज्यांस काळजी आहे अशा सर्वांस हे अहवाल उद्बोधक वाटतील. हे दोन्ही तपशील 'राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य पाहणी' (नॅशनल फॅमिली हेल्थ सर्व्हे) या अधिकृत अहवालात आहेत. हा २०१९-२० सालचा अहवाल केंद्रीय आरोग्य मंत्रालयाकडून प्रसृत केला गेला. जवळपास सहा वर्षांनी झालेल्या या पाहणीस राजकीय परिमाणदेखील निश्चितच आहे. कारण लोकसंख्यावाढीचा बागुलबुवा करण्यात आपल्याकडे अनेकांस स्वारस्य असते. तसेच सामाजिक अंगानेही हे अहवाल महत्त्वाचे आहेत. कारण देशाच्या इतिहासात, बहुधा, प्रथमच महिलांचे जन्मप्रमाण पुरुषांपेक्षा अधिक असल्याचे या पाहणीवरून दिसते. याचा अर्थ स्त्रीभ्रूण हत्येसारखा गलिच्छ दुर्दैवी प्रकार काही प्रमाणात का असेना कमी होऊ लागला असून 'मुलगी झाली हो..' ही बाब आता तितकी आक्रोशकारी राहिली नसावी असे मानण्यास जागा आहे.

सर्वप्रथम जननदराविषयी. तो लक्षणीयरीत्या कमी झाल्याचे यावरून दिसते. कित्येक दशकांपूर्वी कुटुंबनियोजनाचा राष्ट्रव्यापी कार्यक्रम आपल्याकडे सरकारने हाती घेतला. त्यास आता यश येऊ लागले असून प्रथमच आपला राष्ट्रीय जननदर हा २.० इतका कमी झाला आहे. याआधीच्या पाहणीत तो २.२ इतका होता. ही घट किरकोळ वाटली तरी अत्यंत महत्त्वाची आहे. तिचा अर्थ असा की देशातील मातृत्वयोग्य प्रौढ महिला तिच्या आयुष्यात सरासरी दोन अपत्यांस जन्म देते. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या लोकसंख्याविषयक अभ्यासघटकाने निश्चित केलेल्या मापदंडानुसार ज्या वेळी देशाचा जननदर हा २.१ पेक्षा कमी होतो तेव्हा ती त्या देशाच्या लोकसंख्येच्या स्थिरतेची सुरुवात असते. म्हणजे ही गती कायम राखली गेल्यास आपल्याकडे वयपरत्वे वा अन्य कारणांनी मृत्यू पावणाऱ्या नागरिकांची जागा घेण्यास एकास-एक या गतीने बालके प्रसवली जाणार नाहीत.



याचा अर्थ काही दशकांतच भारताची लोकसंख्या वाढ होणे थांबेल आणि देशाची जननसंख्या स्थिरावेल. आताच्या या बाबतच्या तपशिलानुसार सध्या आपल्या शहरी भागांत जननदर १.६ इतका आहे तर ग्रामीण भागांत हे प्रमाण २.१ इतके आहे. याचा अर्थ उघड आहे. शहरी महिला 'दो या तीन बस' असेही न म्हणता, सरासरी एकाच अपत्यावर थांबू लागल्या आहेत. ही परिस्थिती निश्चितच आश्वासक.

ही अर्थातच सरासरी झाली. देशात सर्वत्र समान परिस्थिती आहे असे नाही. काही राज्यांत अजूनही जननदर राष्ट्रीय सरासरीपेक्षाही अधिक असून देशाच्या लोकसंख्या वाढीत त्यांचा मोठा वाटा आहे. बिहार (३), मेघालय (२.९), उत्तर प्रदेश (२.४), झारखंड आणि मणिपूर (२.२) ही राज्ये लोकसंख्या नियंत्रणात तितकीशी यशस्वी नाहीत. या तुलनेत आश्चर्य आहे ते पश्चिम बंगाल या राज्याचे. काही विशिष्ट धर्मीयांची लोकसंख्या या राज्यात वाढत असल्याचा प्रचार अलीकडे मोठय़ा जोमात होताना दिसतो. या प्रचारावर विश्वास ठेवणाऱ्यांची संख्याही भूमिती श्रेणीने वाढत असते. पण प्रत्यक्षात या राज्याचा जननदर हा १.६ इतका आहे. या मुद्दय़ावर पश्चिम बंगालशी बरोबरी करणारे राज्य म्हणजे महाराष्ट्र. आकाराने अवाढव्य असूनही महाराष्ट्राने १.६ इतकाच जननदर राखला असून यावरून या उभय राज्यांतील शहरीकरण तसेच महिलांची प्रागतिकता दिसून येते. कर्नाटक, आंध्र प्रदेश, हिमाचल प्रदेश, केरळ, तमिळनाडू, त्रिपुरा, तेलंगणा, ओडिशा आदी राज्यांचा जननदरही दोनपेक्षा कमी आहे. याचा अर्थ असा की 'मागास' म्हणवल्या जाणाऱ्या राज्यांतील लोकसंख्यावाढ वगळता अन्य देशभर लोकसंख्या नियंत्रण मोहिमांस चांगली 'फळे' लागली. तसेच आगामी काळात महिलांचे प्रमाणही पुरुषांच्या तुलनेत वाढेल, असे या पाहणीवरून दिसते. आपल्याकडे आगामी काळात दर १००० पुरुषांमागे १०२० इतक्या महिला असतील. देशाच्या इतिहासात हे प्रथमच घडत असावे. या सकारात्मकतेनंतर या अहवालाचा दुसरा भाग.

तो या नागरिकांच्या आरोग्याविषयी भाष्य करतो. त्यानुसार आपल्या देशातील एकूण महिलांतील निम्म्यापेक्षा अधिक महिला या कुपोषित/अशक्त आहेत आणि त्याच वेळी एकचतुर्थांश महिला आणि तितकेच पुरुष हे स्थूलत्वग्रस्त आहेत. हे दोन्ही एकत्र असणे आपल्या आरोग्याची दशा दाखवणारे आहे. यातील गंभीर बाब अशी की या दोन्हींच्या प्रमाणात २०१४-१५ नंतर-म्हणजे याआधीच्या पाहणीनंतर-वाढच होताना दिसते. २०१५ सालच्या अहवालात आपली ५३.१ टक्के इतकी नारीशक्ती अशक्त/ कुपोषित/ रक्तक्षयग्रस्त आढळली होती. आताच्या ताज्या अहवालात मात्र हे प्रमाण ५७ टक्क्यांवर गेले आहे. त्याच वेळी या काळात स्थूलत्वव्याधीग्रस्त महिलांच्या प्रमाणातही २०.६ टक्क्यांवरून २४ टक्के इतकी प्रचंड वाढ झाली आहे. आधीच्या पाहणीनुसार हे असे स्थूल पुरुष १८.९ टक्के इतकेच होते. ताज्या अहवालात यात वाढ होऊन २२.९ टक्के पुरुष अपेक्षेपेक्षा अधिक आकार व्यापलेले आढळले. जणू ही बाब पुरेशी काळजी वाढवणारी म्हणून की काय या काळात मुडदूसग्रस्त/ कुपोषित/ अशक्त बालकांच्या प्रमाणातही चिंताजनक वाढ झाल्याचे आढळते. सहा वर्षांपूर्वीच्या अहवालानुसार आपल्या देशात अशा बालकांचे प्रमाण ५८.६ टक्के इतकेच होते. आता ते ६७.१ टक्क्यांवर गेले आहे. याचा अर्थ असा की सरासरी दर तीनांतील एक मूल आपल्याकडे अनारोग्यमय अवस्थेत आहे. तारुण्याच्या उंबरठय़ांवर असलेल्या अशक्तांची संख्याही अशीच आपल्याकडे वाढताना दिसते. अशा तारुण्यसुलभ पण अशक्त तरुणींच्या प्रमाणात ५४.१ टक्क्यांवरून ५९.१ टक्के इतकी वाढ झाली तर अशा तरुणांचे प्रमाण २२.७ टक्क्यांवरून २५ टक्क्यांवर गेले. यात पुन्हा उल्लेखनीय अशी बाब म्हणजे स्थूलत्वग्रस्त पुरुषांचे प्रमाण हे आपल्या खेडय़ांपेक्षा शहरांत अधिक आहे. शहरातले २९.८ टक्के पुरुष 'जाडे' म्हणावे असे आहेत तर ग्रामीण भागात हेच प्रमाण जेमतेम १९.३ टक्के इतके आहे. याचा अर्थ उघड आहे. शहरी पुरुष हा या काळात अधिक बसकवडा बनला असून त्याच्या शारीरिक हालचाली त्यामुळे कमी झालेल्या आहेत. परंतु शहरी महिलांमध्ये हे स्थूलतेचे प्रमाण पुरुषांपेक्षा किती तरी अधिक आढळते. सहा वर्षांपूर्वी अशा शहरी स्थूल महिला १९.७ टक्के इतक्या होत्या. सध्या त्यांची संख्या ३३.२ टक्क्यांवर गेली आहे.

हे सर्वच चिंता वाढवणारे म्हणायला हवे. एका बाजूला आपण स्वत:च स्वत:ला 'तरुणांचा देश' म्हणवून घेण्यात धन्यता मानतो. तसा तो आहेही. पण या तरुणांचे आरोग्य काय, हे या अहवालातून दिसते. हे वर्तमान पुरेसे काळजीवाहू वाटत नसेल त्यांनी याआधारे येणाऱ्या भविष्याचा अंदाज बांधून पहावा. घटती जननक्षमता आणि जे जन्मतात ते असे अशक्त. तेव्हा यावर विचार आणि कृती व्हायला हवी.

## लिफ्ट देण्याचा बहाणा, निर्जनस्थळी नेत महिलांची लूट, पुण्यातील भामटा अखेर जेरबंद



पुणे : लिफ्ट देण्याच्या बहाण्याने महिलांना लुटणारा भामटा जेरबंद झाला आहे. पुणे जिल्ह्यातील चाकण ओद्योगिक वसाहतीत हा प्रकार घडत होता. आरोपीने अनेक नोकरदार महिलांची लूट केल्याचा आरोप आहे.

लिफ्ट देण्याच्या बहाण्याने दुचाकीवर बसवून भामट्याने अनेक महिलांना लुटल्याचं समोर आलं आहे. पुण्यातील चाकण पोलिसांनी या प्रकरणी आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. काय आहे प्रकरण?

चाकण औद्योगिक वसाहत अर्थात एमआयडीसी भागात अनेक महिला विविध कंपन्यांमध्ये काम करत आहेत. सकाळी घाई गडबडीच्या वेळी महिला कार्यालयात जात असताना आरोपी लिफ्ट देण्याच्या बहाण्याने त्यांना थांबवत असे.

ऑफिसला वेळेत पोहोचण्याच्या आशेने गडबडीत अनेक महिला आरोपीच्या दुचाकीवरुन येण्यास तयार होत असत. लिफ्ट घेतल्यानंतर त्यांना कंपनीपर्यंत सोडण्याच्या बहाण्याने भामटा बाईकवर बसवलेल्या महिलेला निर्जनस्थळी घेऊन जात असे. निर्जनस्थळी नेऊन महिलांची लूट आजूबाजूला कोणी नसल्याचे पाहून आरोपी महिलांना लुटत असे. दिवसेंदिंवस अशा प्रकारच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचं निदर्शनास आलं होतं. या तक्रारी वाढलत असताना या प्रकरणाची पोलिसांनी गांभीर्याने दखल घेतली होती. त्यानंतर मोठ्या शिताफीने अशाप्रकारे लुटणाऱ्या भामट्यास चाकण पोलिसांनी अटक केली आहे.

परदेशी महिलेवर बलात्कार

दरम्यान, युगांडा देशाची नागरिक असलेल्या 28 वर्षीय महिलेला मोटरसायकलवर लिफ्ट देणाऱ्या दोघांनी बलात्कार केल्याची घटना दोन वर्षांपूर्वी पुण्यात उघडकीस आली होती. रात्री उशिरा बारा वाजण्याच्या सुमारास मोटारसायकलवरून आलेल्या एका व्यक्तीने कोरेगाव पार्क परिसरातील एका रेस्टॉरंटच्या बाहेर उभ्या असलेल्या महिलेला गाठले. तिला इप्सित स्थळी नेण्याचं आमिष दाखवत बाईकवर मध्ये बसवले. त्यानंतर निर्जनस्थळी नेऊन बाईकस्वार आणि त्याच्यासोबत असलेल्या त्याच्या मित्राने परदेशी महिलेवर सामूहिक बलात्कार केल्याचा आरोप झाला होता.

## मॅट्रोमोनिअल साइटवरील ओळख भोवली ; गुंगीचे औषध देत तरुणीवर केला बलात्कार



पिंपरी- शहरात गेलया काही दिवसांपासून मुलींवरील अत्याचाराच्या घटना वाढत आहेत. आयटी कंपनीतील तरुणीला स्वयंपाकाच्या निमिताने घरी बोलावून बलात्कार केल्याची घटना ताजी असतानाच दुसरीकडे तरुणीला शीतपेयातून गुंगीचे औषध देत तिच्यावर बलात्कार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याबाबत पीडित तरुणीनं पिंपरी पोलीस ठाण्यातआरोपीच्या विरोधात तक्रार केली आहे. सचिन बलदेव शर्मा असं गुन्हा दाखल झालेल्या तरुणाचं नाव असून तो मूळचा पंजाब राज्यातील पटीयाला येथील रहिवासी आहे. आरोपीनं 24 जानेवारी 2020 ते 1 जानेवारी 2021 दरम्यान पीडितेवर अनेकदा अत्याचार केला आहे.

अशी घडली घटना

मिळालेल्या माहितीनुसार पीडित तरुणी व आरोपीची मॅट्रोमोनिअल साइटवर ओळख झाली. या ओळखीचे रूपांतर पुढे मैत्रीत , त्यानंतर प्रेमात झाले. यानंतर आरोपीने पीडितेने लंगणाचे आमिष दाखवत तिला विविध ठिकाणी फिरायला घेऊन गेला. त्या ठिकाणी आरोपीनं पीडितेला गुंगी येणारं औषध देत तिच्यावर अत्याचार केला . यानंतर पुन्हा मी तुझ्याशीच लग्न करणार आहे असे सांगत पीडित तरुणीशी सातत्याने शारीरिक संबंध ठेवले. मात्र आरोपीच्या मागील वर्षभरापासून सुरु असलेल्या त्रासाला कंटाळून पीडितेने पोलिसात धाव घेतली.

## पुणे सोलापूर महामार्गावर अज्ञात वाहनाने 5 जणांना चिरडलं; तीन जणांचा जागीच मृत्यू, दोघे गंभीर जखमी



पुणे: पुणे-सोलापूर महामार्गावरील कुरकुंभ गावच्या हद्दीमध्ये पुण्यावरून सोलापूरच्या दिशेने जाणाऱ्या अज्ञात वाहनाने पाच जणांना चिरडल्याची घटना घडलीय. अज्ञात वाहनाच्या धडकेत तीन जणांचा जागीच मृत्यू झालाय तर दोन जण गंभीर रित्या जखमी झालेत.अज्ञात वाहन पुणे-सोलापूर महामार्गावरुन पुण्याकडून सोलापूरच्या दिशेने चालले होते. अपघाताची माहिती मिळताच दौंड पोलीस स्टेशनचे अधिकारी कर्मचारी घटनास्थळावर दाखल झाले. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आल्यानंतर पोलिसांना वाहतूक सुरळीत केली आहे.

अपघात कसा झाला?

पुणे- सोलापूर हायवेवर कुरकुंभ गावच्या हद्दीत काही जण महामार्ग ओलांडत होते. याच दरम्यान महामार्ग क्रॉस करताना अज्ञात वाहनाची धडक बसल्याने तीन जणांचा जागीच मृत्यू झाला. या अपघातामध्ये एका महिलेसह दोन लहान मुलांचा देखील समावेश आहे.तर दोघा जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

वाहनाचा शोध सुरु

शुक्रवारी सांयकाळी सहा ते साडे सहाच्या दरम्यान अपघात झाल्याची माहिती मिळाली होती. यामध्ये पाच जण जखमी झाले होते. यामधील तीन जण गंभीर जखमी त्यांचा जागीच मृत्यू झाला आहे. या सर्वांना तात्काळ रुग्णवाहिका बोलवून दौंड येथी रुग्णालयात पाठवलं होतं. ज्या वाहनानं अपघात झाला त्या वाहनाचा शोध घेण्यात येत आहे. पुण्याकडून सोलापूरकडे जाणाऱ्या वाहनानं रस्ता ओलांडणाऱ्यांना उडवलं. अपघात करुन तो वाहनचालक गायब झाला आहे. तो थांबलेला नाही,असं दौंडचे पोलीस निरीक्षक विनोद गुघे यांनी सांगितलं आहे.

पोलिसांकडून वाहतूक सुरळीत

कुरकुंभ गावच्या हद्दीत अपघात झाल्याची माहिती मिळताच दौंड पोलीस स्टेशनचे अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. घटना स्थळाचा पंचनामा केल्यानंतर पोलिसांनी जखमींना रुग्णवाहिकेतून दौंडच्या रुग्णालायत पाठवलं. पोलिसांनी यानंतर पुण्यावरुन सोलापूरला जाणारी वाहतूक सुरळीत केली. ज्या वाहनानं रस्ता ओलांडणाऱ्यांना उडवलं त्या वाहनाचा शोध सुरु असल्याचं पोलिसांच्याकडून सांगण्यात आलं आहे.

# पिंपरीत वाहन चोरांचा सुळसुळाट ; एका दिवसात 7 दुचाकीसह एका टेम्पोवर चोरांचा डल्ला




पिंपरी – शहरातील वाढत्या वाहन चोरीच्या घटनाही पिंपरीकर नागरिक वैतागले आहेत. पिंपरी पोलिसांनी वाहन चोरी टोळीनं आळा घालण्याची मागणी सर्वमान्यकडून केली जात आहे. शहरात नुकतेच सात दुचाकीच्या एका टेम्पो चोरीला गेल्याची तक्रारी पोलीस स्थानकात दाखल झाल्या आहेत.

सहाराच्या विविध भागात या घटना घडल्या आहेत. यामध्ये श्रीराम मारुती भोसले (वय ५५, रा. संतनगर, मोशी प्राधिकरण) यांनी याप्रकरणी एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. दोन लाख रुपये किमतीचा पिकअप टेम्पो त्यांच्या राहत्या घराच्या सोसायटीसमोर रस्त्यावर पार्क करण्यात आला होता . अज्ञातांनी चोरून नेल्याची तक्रार त्यांनी दिली होती. याशिवाय चाकण, निगडी, भोसरी, पिंपरी, दिघी, तळेगाव दाभाडे आणि चिखली पोलीस ठाण्याच्याहददीतून दुचाकींची चोरी झाल्याचे समोर आले आहे.

गस्ती पथक नेमावे सातत्याने होत असलेल्या याचोरीला नागरिक वैतागले असून पोलीस प्रशासनाने चोरांचा बंदोबस्त करण्याची मागणी केली जात आहे. दुचाकी चोरीचे वाढते प्रमाण रोखण्यासाठी पोलिसांनी गस्ती पथक नेमण्याची मागणी स्थानिक नागरिक करत आहेत. रात्री घराबाहेर पार्क केलेलं वाहन सकाळी उठेपर्यंत गायब झालेली असतात. अनेक नागरिकांच्या मनात याची धास्ती निर्माण झाली आहे.

# कुख्यात गँगस्टर अमित भोगलेला बेड्या, दोन देशी पिस्तूल, 8 जिवंत काडतुसे, शस्त्र जप्त, मुंबई पोलिसांची कारवाई!




मुंबईः कुख्यात गँगस्टर अमित भोगलेला खुन्याच्या गुन्ह्यात अखेर मुंबई पोलिसांनी अटक केली आहे. भाजूपमधील सूरज मेहरा उर्फ सूरज नेपाळी याच्या हत्येप्रकरणी गुन्हे शाखेने ही कारवाई केली आहे. अमित भोगलेवर याआधी 3 खुनाचे गुन्हे आहेत तर एकूण 11 गुन्हे दाखल आहेत. अमित भोगले हा तडीपार होता, त्यांच्याचर मोक्का,एमपीडीएसारखे गुन्हे दाखल आहेत. 3 ऑक्टोबरला केली होती हत्या गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या सूरज नेपाळी याने कारागृहातून बाहेर पडताच त्याचा अमित भोगलेसोबत वाद झाला होता. त्यावेळी सूरजने त्याला थेट एकट्याने भिडण्याची धमकी दिल्याचे समजते. याच रागातून भोगले याने सूरजची हत्या घडवून आणल्याचा संशय गुन्हे शाखेला आहे. 3 ऑक्टोबर रोजी ही हत्या झाली होती. या प्रकरणी पोलिसांनी आधी 8 आरोपींना ताब्यात घेतलेले आहे. या गुन्ह्यात भोगलेचा सहभाग स्पष्ट होताच गुन्हे शाखेने भोगलेला बेड्या ठोकल्या. हत्यारांचा साठा जप्त अमित भोगलेच्या अटकेनंतर त्याच्याकडून एक स्टेनलेस स्टीलचे ब्लेड, एक तलवार, स्टीलचा एक स्ट्रेस पीस, दोन देशी पिस्टल आणि 8 जिवंत काडतुसे, एक सफेद रंगांची ग्लोस्टर गाडी आणि दोन मोबाईल एवढं साहित्य जप्त करण्यात आलंय. जप्त केलेल्या या साहित्याची किंमत 43 लाख 800 रुपये इतकी आहे. डीसीपी निलोत्पल यांच्या मार्गदर्शनखाली ही मोठी कारवाई गुन्हे शाखेने केली आहे.

# दौंडच्या DYSP कडून छेडछाड, पुण्याच्या वकील महिलेचा मंत्रालयाबाहेर आत्महत्येचा प्रयत्न

मुंबई : मंत्रालयाच्या बाहेर एका महिलेने आत्महत्येचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पुणे जिल्ह्यातील दौंडच्या पोलीस उपअधीक्षकांनी आपल्यासोबत छेडछाड केल्याचा आरोप तिने केला आहे. या प्रकरणी न्याय मिळत नसल्याने मुंबईत येऊन मंत्रालय परिसरात तिने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याची माहिती आहे. तक्रार करणारी महिला पेशाने वकील आहे. आत्महत्येच्या प्रयत्नाचा प्रकार कॅमेरामध्ये कैद झाला असून सध्या पोलिसांनी तिला ताब्यात घेतले आहे.

काय आहे प्रकरण पुणे जिल्ह्यातील दौंड येथील वकील महिलेने मुंबईतील मंत्रालय परिसरात आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. दोंडचे डीव्हायएसपी (Deputy Superintendent of Police -पोलीस उपअधीक्षक) यांनी आपल्यासोबत छेडछाड केल्याचा दावा महिलेने केला आहे. पोलीस अधिकाऱ्यावर कारवाई न केल्याचा दावा पोलीस अधिकाऱ्याविरोधात तक्रार करुनही कारवाई केली जात नव्हती. पोलिसांकडून महिलेवरच गुन्हा दाखल करण्यात आला होता. दाद मागण्यासाठी वकील महिला वारंवार वरिष्ठ पोलिसांची भेट घेत होती, तरीही न्याय मिळत नसल्याचा आरोप करत तिने टोकाचं पाऊल उचललं. धक्कादायक म्हणजे महिलेने तिसऱ्यांदा आत्महत्येचा प्रयत्न केल्याचं समोर आलं आहे. सबंधित महिला मरिन ड्राईव्ह पोलिसांच्या ताब्यात आहे.

# व्हिस्की खरेदीच्या नादात दादरमधील 74 वर्षीय अभिनेत्रीची फसवणूक, 3 लाखांचा ऑनलाईन गंडा

मुंबई : हिंदी टीव्ही मालिकांमधील लोकप्रिय अभिनेत्रीची ऑनलाईन फसवणूक झाल्याचं समोर आलं आहे.

वाईन शॉपचा कर्मचारी असल्याचं भासवणाऱ्या सायबर गुन्हेगाराने 74 वर्षीय महिलेची 3 लाख रुपयांना फसवणूक केल्याचा आरोप आहे. मुंबईतील दादर भागात ही घटना घडल्याची माहिती आहे.

**काय आहे प्रकरण?**

शिवाजी पार्क पोलिस ठाण्यात दाखल केलेल्या तक्रारीनुसार, पुण्यात लग्न करणाऱ्या आपल्या पुतण्यासाठी संबंधित अभिनेत्री पार्टीचं आयोजन करणार होती. त्याला अमृत व्हिस्कीची बाटली भेट देण्याची तिची इच्छा होती. "गिफ्ट देण्यासाठी मी गुगलवर वाईन शॉपचे नंबर शोधायला गेले आणि मला दोन मोबाईल नंबर मिळाले" असे तिने पोलिसांना सांगितले.

**गुगलवर शोधलेल्या नंबरवर कॉल**

अभिनेत्रीने त्यापैकी एका मोबाईल नंबरवर कॉल केला आणि व्हिस्कीसाठी 4,800 रुपये दिले, पण त्याची डिलिव्हरी तिला मिळाली नाही. त्यामुळे तिने पुन्हा त्या नंबरवर कॉल करुन आपले पैसे परत मागितले.



परंतु फोनवर बोलणाऱ्या व्यक्तीने तिला सांगितले की, कोणतेही रिफंड मिळवण्यासाठी सरकारी नियमांनुसार वाईन शॉपमध्ये तिला ऑनलाईन नोंदणी करणे अनिवार्य आहे.

**ओटीपी मागून फसवणूक**

आरोपीने महिलेच्या डेबिट कार्डचे तपशील घेतले आणि वनटाईम पासवर्ड (OTP) जनरेट केला. अभिनेत्रीच्या मोबाईलवर आलेला ओटीपी त्याने शेअर करण्यास सांगितला.

**हा परतावा प्रक्रियेचा भाग आहे असे समजून,**

तिने ओटीपी शेअर केला. अशा प्रकारे त्याने अनेक ऑनलाईन व्यवहार केले आणि तिच्या खात्यातून मोठ्या प्रमाणावर रक्कम ट्रान्सफर करुन घेतली.

**क्रेडिट कार्डचेही डिटेल्स मागितले**

आरोपीने नंतर तिच्या डेबिट कार्डमध्ये काहीतरी प्रॉब्लेम असल्याचे सांगितले आणि तिला तिच्या क्रेडिट कार्डचे तपशील देण्यास सांगितले. अभिनेत्रीने त्याचेही तपशील आणि ओटीपी शेअर केला. त्यानंतर आणखी काही ऑनलाईन ट्रांझॅक्शन्स झाल्या. एकंदरीत तिचे 3.05 लाख रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती आहे.

तिने आरोपीला अनेक वेळा फोन केला, पण त्याने उचलला नाही आणि नंतर त्याचा फोन बंद (स्विच्ड ऑफ) केला. महिलेने अखेर दादरमधील शिवाजी पार्क पोलिसांमध्ये धाव घेत तक्रार दाखल केली. पोलिसांनी गुन्हा दाखल करुन अधिक तपास सुरु केला आहे. गुगलवर मोबाईल नंबर शोधून ऑनलाईन ऑर्डर न करण्याचे आवाहन सायबर तज्ज्ञांकडून वारंवार केले जाते.

***त्याचप्रमाणे ऑनलाईन व्यवहार करताना अधिक सतर्कता बाळगण्यासही सांगितले जाते. ज्येष्ठ नागरिकांना ऑनलाईन ट्रँझॅक्शन करताना विशेष काळजी घेण्याचं आवाहन केलं जात आहे.***

# हवाला व्यापाऱ्यांवर सर्जीकल स्ट्राईक, 84 लाखांची रोकड कुठून केली जप्त?

नागपूर : विधान परिषद निवडणुकीत मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार होतात. त्या पार्श्वभूमीवर पोलीस सतर्क झाले आहेत. पोलिसांनी नऊ ठिकाणी झाडाझडती घेतली. हवालाची 84 लाख रुपयांची रोकड रात्री जप्त केली. यामुळं हवाला व्यवसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे.

परिमंडळ तीनचे पोलीस उपायुक्त गजानन राजमाने यांनी हा सर्जिकल स्ट्राईक केला. नागपुरात सुमारे दोनशे हवाला व्यावसायिक आहेत. हे व्यवसायिक कोट्यवधीच्या रक्कमेची हेराफेरी करतात. यापैकी नऊ ठिकाणी लकडगंज आणि इतवारीत पोलिसांनी धाडी टाकल्या.

**व्यापारी किराणा व धान्य विक्रीशी संबंधित**

भुतडा ॲण्ड भुतडा कंपनीवर ही कारवाई केल्याचे समजते. शुक्रवारी दुपारी गजानन राजमाने यांनी भुतडा चेंबरवर छापा टाकला. यात अमरदीप टॉकीजवळ असलेल्या एका बड्या व्यापाऱ्याच्या घरी पोलिसांनी धाड टाकली. यात



जप्त करण्यात आलेली रक्कम हवालाची असल्याचे सांगण्यात येते. त्याचबरोबर पोलिसांनी इतवारी आणि लकडगंजमधील अन्य ठिकाणी धाडी टाकल्या. या धाडी किराणा व धान्य विक्रीशी संबंधित व्यापारी आहेत.

**दोन लॉकरमधून जप्त केली रक्कम**

धान्य बाजार येथे दुमजली इमारत आहे. त्या इमारतीत 22 खोल्या आहेत. काही खोल्यांमध्ये भुतडा कंपनीचे कार्यालय आहे. या कार्यालयातून मोठ्या प्रमाणात हवालाच्या पैशांचा व्यवहार होतो, अशी माहिती लकडगंज पोलिसांना मिळाली होती. येथील कारवाईदरम्यान पोलिसांनी सर्वप्रथम दोन लॉकरची तपासणी केली. त्यात 44 लाख रुपये मिळून आले. त्यानंतर उर्वरित खोल्यांची तपासणी केली असता आणखी दोन लॉकर मिळून आले. या दोन्ही लॉकरमध्ये 40 लाख रुपये सापडले.

**लॉकर्समध्ये रोकड मोजण्याचे यंत्र**

घटनास्थळी पोलिसांना दोनशेच्यावर लॉकर्स सापडली. हे लॉकर्स कुणाचे आहेत, हे पूर्णपणे समजू शकले नाही. बहुतांश लॉकर्समध्ये लाखोंची रोकड, नोटा मोजण्याचे साहित्य पोलिसांच्या हाती लागले. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांना याची माहिती देण्यात आली. प्राप्तीकर विभागाचे अधिकारी यांनीही घटनास्थळी धाव घेतली. प्राप्तीकर विभागाचे अधिकारीही स्वतंत्रपणे चौकशी करीत आहेत.

# इंटर्न डॉक्टरवर बंदूक ताणणारा युवक पुण्यात गेला, पुन्हा नागपुरात सापडला, आत्महत्या करण्याच्या तयारीत?

नागपूर : तीन दिवसांपूर्वी नागपूरच्या मेडिकलमध्ये पॅरा मेडिकल विभागातील इंटर्न डॉक्टरवर बंदूक ताणून तिला धमकवणाऱ्या आरोपीला अखेर अटक करण्यात गुन्हे शाखेच्या पोलिसांना यश आलं आहे. नागपूरहून पळून आरोपी पुण्याला पोहोचला होता, तिथे तो आत्महत्या करण्याच्या तयारीत होता, अशी धक्कादायक माहिती पोलीस तपासात समोर आली आहे. आरोपीने हे कृत्य का केलं, याचा शोध पोलीस घेत आहेत.

**काय आहे प्रकरण?**

नागपूरच्या मेडिकल कॉलेज परिसरात घुसून पॅरा मेडिकलची विद्यार्थिनी असलेल्या युवतीवर विक्की चकोले या आरोपीने बंदूक ताणली होती. युवतीला त्याने जीवे मारण्याची धमकी दिली होती. त्याने बंदुकीचा चापही ओढला होता, मात्र गोळी झाडली गेली नाही आणि युवतीचे प्राण वाचले. आरोपी मात्र पळून गेला होता.

**पुण्याला पळून गेला**

गुन्हे शाखेची सहा पथकं आरोपीचा शोध घेत होते, मात्र तो हाती येत नव्हता. गुरुवारी सकाळी तो रेल्वे स्टेशन परिसरात असल्याची माहिती मिळाली आणि पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळल्या. आरोपी हा नागपूरवरून पुण्याला पळून गेला होता. दोन दिवस तिथे राहिला, मात्र त्याच्या जवळचे पैसे संपल्याने तो परत नागपुरात आला.

**आत्महत्या करण्याच्या तयारीत?**




आरोपी डिप्रेशनमध्ये असून आत्महत्या करण्याच्या तयारीत होता, मात्र वेळीच पोलिसांनी त्याला अटक केली, अशी माहिती मिळत आहे. पोलीस आता त्याने युवतीवर बंदूक का ताणली, त्या दिवशी नेमकं काय घडलं, याचा शोध घेत आहेत.

**नेमकं काय घडलं होतं?**

सोमवार 22 नोव्हेंबर रोजी संध्याकाळी 6 वाजताच्या सुमारास नागपुरातील मेडिकलच्या अधिष्ठाता इमारतीच्या शेजारी असलेल्या ई लायब्ररीजवळ हा प्रकार घडल्याची माहिती आहे. संबंधित इंटर्न महिला डॉक्टर गेल्या काही दिवसांपासून बोलत नसल्यामुळे संतप्त आरोपी विकी चकोले याने तिला भेटण्यासाठी मेडिकलमधील ई-लायब्ररीजवळ बोलावले होते.

आरोपी आणि पीडिता हे दोघे जण बोलत असताना अचानक कुठल्या तरी कारणावरुन त्यांच्यात खटके उडाले. त्यावरुन काही कळण्याच्या आतच आरोपीने खिशातून बंदूक काढली आणि तरुणीच्या दिशेने बंदूक ताणून धरली. त्याने बंदुकीचा ट्रिगरही दाबला होता. मात्र सुदैवाने गोळी बंदुकीतच अडकल्यामुळे पुढील मोठा अनर्थ टळला.

**सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर**

महिलेने लगेच आरडाओरडा केला, तेव्हा जवळपास असलेल्या इतर विद्यार्थ्यांनी त्यांच्या दिशेने धाव घेतली. परंतु आरोपी पळून जाण्यात यशस्वी ठरला. या घटनेमुळे मेडिकलच्या सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. आरोपी पकडला गेल्याने त्याला शिक्षा होईल, हे खरं मात्र मेडिकलसारख्या ठिकाणी बिनबोभाटपणे युवतीवर गन रोखली गेल्यामुळे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत.

# करणी केल्यानेच गाय मेली,' ओल्या वस्त्रानिशी महिलेला मूर्तीवर टाकायला लावले पाणी



जळगाव : पाचोरा तालुक्यातील सारोळा येथे अंधश्रद्धेला बळी पडल्यामुळे धक्कादायक घटना घडलीय. गायीवर करणी केल्याने तिचा मृत्यू झाला असा संशय बाळगून एका महिलेला ओल्या वस्त्रानिशी मंदिरात पाणी घालायला लावण्यात आलंय. या धक्कादायक प्रकारानंतर पाचोरा पोलिसात पीडितेच्या दीरासह सहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आलाय. अंधश्रद्धेला बळी पडू नका असे अनेक सामाजिक संस्था तसेच राज्य सरकारकडून सांगितले जाते. त्यासाठी राज्यात कठोर कायदेदेखील करण्यात आले आहेत. असे असताना जळगावात ही घटना घडलीय. अंगावर पाणी टाकून मूर्तीवर पाणी टाकण्यास सांगितले

मिळालेल्या माहितीनुसार सारोळा येथे रमेश धोंडू पाटील व पत्नी रंजनाबाई वास्तव्यास आहेत. गायीवर करनी केल्याच्या संशयावरुन दीर देवीदास धोंडू पाटील यांच्यासह इतर ग्रमास्थ रंजनाबाई यांच्या घरासमोर आले. त्यांनी रंजनाबाई यांना शिवीगाळ केली. तसेच त्यांचे पती रमेश धोंडू पाटील आणि खुद्द रंजनाबाई यांच्या अंगावर पाणी टाकण्यात आले. या दोघांनाही अंगावरच्या ओल्या कपड्यानिशी देवाच्या मूर्तीवर पाणी टाकायला लावण्यात आले. जादू टोण्यातून हा प्रकार घडल्याचे बोलले जात आहे. पाचोरा पोलिसात जादूटोणाविरोधी कायद्यानुसार गुन्हा दाखल

याप्रकरणी रंजनाबाई यांचे दीर देवीदास पाटील, मंगलाबाई पाटील, गणेश देवीदास पाटील, ज्योती देवीदास पाटील, अनिल देवीदास पाटील यांच्याविरोधात पाचोरा पोलिसात जादूटोणाविरोधी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस अधीक्षक डॉ. प्रवीण मुंढे यांनी घटनेला दुजोरा दिलेला आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यामुळे पालीस पुढचा तपास करत आहेत. दरम्यान, या प्रकारामुळे जळगाव जिल्ह्यातील सारोळा पंचक्रोशीत एकच चर्चा सुरु आहे. करणीसारख्या काल्पनिक प्रकाराचा आधार घेत एका महिलेला त्रास देणे चुकीचे असल्याची भावना व्यक्त होतोय.

# मुलीचे अपहरण करुन कपाटात कोंडणारा आरोपी कोठडीत, यापूर्वीही एका बलात्कारात दोषी!




औरंगाबादः दोन वर्षाच्या मुलीला मारहाण करत लाकडी कपाटात कोंडण्याची धक्कादायक घटना शहरात शनिवारी रात्री घडली. दलालवाडीतील या संतापजनक प्रकारानंतर नागरिकांनी संबंधित आरोपीला चांगलाच चोप दिला होता. शशिकांत दिलीप भदाणे असे या विकृताचे नाव असून या प्रकरणी क्रांती चौक पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. न्यायालयाने विकृत आरोपीला 2 डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याच आदेश दिले आहेत. दोन वर्षाच्या मुलीला कपाटात कोंडले होते दलालवाडी परिसरात शनिवारी संध्याकाळी साडेसात वाजेच्या सुमारास एका कुटुंबातील दोन वर्षाची चिमुकली बेपत्ता झाली होती. तसेच दलालवाडीतील याच परिसरात नुकताच भाड्याने राहण्यासाठी आलेल्या आरोपीच्या घरातून नागरिकांना लहान मुलीचा रडण्याचा आवाज ऐकू आला. दरवाजा बाहेरून बंद होता. स्थानिकांनी तत्काळ दरवाजा तोडून पाहिल्यास कपाटात ती मुलगी आढली. मुलीच्या नाकातून रक्त येत होते. नागरिकांनी तत्काळ तिच्यावर प्राथमिक उपचार करून क्रांती चौक पोलीस स्टेशन गाठले. दरम्यान आरोपी बाजूच्याच परिसरात फिरत असल्याचे नागरिकांच्या दृष्टीस पडले तेव्हा लोकांनी त्यालाही चांगलाच चोप दिला आणि पोलिसांच्या तावडीत दिले.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ). संपर्कः-9594418181 / 8424989898